**प्रेसनोट दि. २८/०४/२०२३**

लोकसेवक सचिन प्रल्हाद इंगोले, वय-३८ वर्षे,तलाठी कुपवाड रा.विजयनगर कुपवाड रो, कृष्णकुंज अपार्टमेंट, फ्लॅट नं १०४ सांगली, यांनी १०,०००/- रूपये लाचेची मागणी करून १०,०००/- रूपये लाच स्विकारले नंतर रंगेहाथ पकडले बाबत सांगली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांचा मित्र निखील आठवले याचे आजोबा (आईचे वडील) गुलाब सुदाम गाडे यांनी सन १९९२ मध्ये गुंठेवारी मधील सध्याचे अजिंक्यनगर कुपवाड येथील घरजागा गट नंबर ३३१/४ ही बबर काळु परीट जमदाडे यांचेकडुन खरेदी पत्र करुन घेतलेली आहे. सदर जागेचे महानगरपालिकेचे गुंठेवारी प्रमाणपत्र घेतलेले आहे. परंतु जागेच्या ७/१२ उता-याला नावे लावलेली नसल्याने ७/१२ उता-याला नावे लावणे करिता कुपवाड तलाठी कार्यालय येथे अर्ज दिला होता सदर नोंद ही जुनी असलेने त्याची नोंद ७/१२ सदरी घालणे करिता तलाठी कुपवाड श्री.सचिन इंगोले यांनी तक्रारदार यांचेकडे १०,०००/- रु लाचेची मागणी केली असल्या बाबतचा तक्रारी अर्ज दिनांक २७/०४/२०२३ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो सांगली पथकास दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक २७/०४/२०२३ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता सदर पडताळणी मध्ये लोकसेवक तलाठी कुपवाड श्री.सचिन इंगोले यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांच्या मित्राचे कामा करिता १०,०००/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले आहे.

त्यानंतर दि.२८/०४/२०२३ रोजी तलाठी कार्यालय कुपवाड या ठिकाणी लोकसेवक तलाठी कुपवाड श्री.सचिन इंगोले यांचे विरूध्द सापळा कारवाई आयोजीत केली असता सापळा कारवाई वेळी लोकसेवक तलाठी कुपवाड श्री.सचिन इंगोले यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे मित्राचे कामा करिता लाचेची मागणी करून १०,०००/- रूपये तक्रारदार यांचेकडून स्विकारले असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने लोकसेवक श्री.सचिन प्रल्हाद इंगोले, वय-३८ वर्षे,तलाठी कुपवाड रा.विजयनगर कुपवाड रोड, कृष्णकुंज अपार्टमेंट, फ्लॅट नं १०४ सांगली यांचे विरुध्द कुपवाड एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. अमोल तांबे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्री. सुरज गुरव सो,अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. संदीप पाटील, पोलीस उप अधीक्षक, श्री.विनायक भिलारे पोलीस निरीक्षक, श्री.दत्तात्रय पुजारी पोलीस निरीक्षक, पोलीस अंमलदार ऋषिकेश बडणीकर, अजित पाटील, सलीम मकानदार, रविंद्र धुमाळ, चंद्रकांत जाधव राधिका माने, चालक अनिस वंटमुरे यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच मोबाईल नंबर ९८२१८८०७३७ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सांगली

(संदीप पाटील)
पोलीस उप अधीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली.

Scanned with OKEN Scanner